# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ६५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०८/१०/२०१६

**१) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन मारण्या पीटण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ०७/१०/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी साहेबराव सायजी टेंभरे वय ५३ वर्ष, रा. मालुटोला हा हजर असतांना शारदा देवेची पुजा आरती झाल्या नंतर खुशाल पारधी हा शारदा देवीची देनगी देणा—यांचे नावाचे वाचन करतांना त्याने पायल जागेस येळे असे नाव घेताच यातील आरोपीतांनी शारदा देवी जवळ येवुन संगनमत करुन फिर्यादीला पायल ही माझी पत्नी नसतांनी त्यात माझे नाव का घेतले असे म्हणुन फिर्यादीला अश्लिल शब्दात शिविगाळ करुन मारण्या पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिविगाळ व मारण्या पीटण्याची धमकी . :—**

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रशांत शामराव राजुरकर वय २५ वर्ष, रा. नेहरु वार्ड शहापुर याने आरोपी क्र. १ यास माझे पत्नीस टॉटींग का करतोस असे हटकले असता आरोपी क्र. १ ने माझेवर खोटा आरोप लावतोस म्हणुन भांडण करुन फिर्यादीस तुझी बायको इंद्राची परी आहे का असे म्हणुन अश्लिल शब्दात शिविगाळ केली व दोन्ही आरोपीतांनी ढकलढुकल करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,५०९,५१०,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) शेतीच्या वादावरून शिविगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०७/१०/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादीने नवेगाव शेतशिवारा मधील सौ. जया मुकरी काबरा रा. भंडारा हिचे कडुन बटईने केलेल्या शेताची पाहणी करण्या करीता शेतावर गेला असता त्यातील आरोपी हा तिथे येवुन फिर्यादीला हे माझे शेत आहे तु लगेच खाली कर असे म्हणुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी संजय मुरली सेलोकर वय ४० वर्ष, रा. शहापुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) हुंडयाचे मागणी वरून लग्नास नकार दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/०३/२०१६ ते ०७/१०/२०१६ रोजी पर्यन्त. यातील फिर्यादीची मुलगी हीचे लग्न जोडुन आरोपी क्र. १ याचे सोबत साक्षगंध करण्यात आले. साक्षगंध नंतर आरोपी व त्याचे घरचे मंडळी लग्नाची तारीख ठरविण्याकरीता बसले असता आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीला १ लाख रु. ची हुंडयाची मागणी केली. त्यावेळी फिर्यादीने आरोपी याची हुंडयाची मागणी पुर्ण न केल्याने आरोपी यांनी लग्न करण्यास नकार दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४(ब), हुंन्डा प्रतीबंधक कायदा भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) इसमाचा औषधोपचारा दरम्यान मृत्यु. :—**

दिंनाक. ०६/१०/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील मृतक प्रकाश केवलराम शहारे वय ४५ वर्ष, रा. कोच्ची याची प्रकृती दिनांक ०६/१०/२०१६ चे ०३.०० वा. दरम्यान स्वतःचे घरी बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रामीन रुग्णालय लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान ११.०० मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. लाखांदुर येथे मर्ग ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र सैनीक ७२३ यांनी पो. स्टे ला आनुन पेश केल्याने पो.स्टे दिघोरी कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहे.